विनामूल्य वितरणासाठी

# कार्यशिक्षण

## इयत्ता तिसरी



कार्यशिक्षण इयत्ता तिसरी (मराठी माध्यम)

# टेली मानस हेल्पलाईन

**Tele MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States)**

(१४४१६ / १८००-८९-१४४१६)

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत टेली मानस ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२ पासून राबवण्यात येत आहे. टेली मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन क्रमांक १४४१६द्वारे मोफत २४ × ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली मानस हेल्पलाईनवर दूरध्वनी केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे आपल्या समस्या सदर हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनीद्वारे (कॉल करून) सांगाव्यात तसेच मनात असणाऱ्या शंका विचाराव्यात आणि आपल्या समस्येविषयी मदत घ्यावी व दुसऱ्यांनाही मदत घेण्यास सांगावे.

# मनोदर्पण

मनोदर्पण (८४४८४४०६३२) ही मोफत दूरध्वनी सेवा जुलै २०२०पासून शिक्षा मंत्रालय यांच्यामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील मनोदर्पण कक्षाद्वारे विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच शिक्षकांना मानसशास्त्रीय मार्गदर्शन व साहाय्य प्रदान करण्यासाठी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या कालावधीत आठवड्यातील सर्व दिवस उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन घेण्यासाठी या हेल्पलाईनवर देखील दूरध्वनी करू शकतात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास -२११६/(प्र. क्र. ४३/१६) एसडी -४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक १३.०४.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# कार्यशिक्षण

## इयत्ता तिसरी

समग्र शिक्षा



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

सोबतच्या चौकटीतील Q.R. Code स्मार्टफोनद्वारे स्कॅन केल्यास आपणांस डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक्, श्राव्य आणि दृक्श्राव्य स्वरूपातील अध्ययन-अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती
२०२६

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**✻ कार्यशिक्षण समिती सदस्य ✻**

| | |
|---|---|
| श्रीमती पल्लवी आपटे | (अध्यक्ष) |
| श्रीमती लिना तलाठी | (सदस्य) |
| श्रीमती तेजस्विनी म्हस्के | (सदस्य) |
| श्रीमती वंदना फडतरे | (सदस्य) |
| श्री. सुनिल मोरे | (सदस्य) |
| डॉ. रुपेश तांबे | (सदस्य) |
| श्रीमती गीतांजली काशिद | (सदस्य) |
| श्री. अंकित देशमुख | (निमंत्रित सदस्य) |
| श्रीमती रश्मी राजपूरकर | (निमंत्रित सदस्य) |
| श्री. प्रकाश पारखे | (निमंत्रित सदस्य) |
| श्री. विद्याधर म्हात्रे | (निमंत्रित सदस्य) |
| श्रीमती दिपाली जोगदंड | (अभ्यासक्रम समन्वयक) |
| डॉ. अजयकुमार लोळगे | (सदस्य सचिव) |

**✻ गुणवत्ता समीक्षक ✻**

| | |
|---|---|
| डॉ. एम. जी. गुरव | (गुणवत्ता परीक्षक) |
| ॲड. संदेश साखरे | (विधीतज्ज्ञ) |
| डॉ. अतुल जाधव | (CWSN तज्ज्ञ) |

**✻ संयोजक ✻**

डॉ. अजयकुमार लोळगे
**विशेषाधिकारी, कार्यानुभव (वि.का)**
प्र. विशेषाधिकारी, कला
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे - ४

**✻ मुखपृष्ठ व अंतर्गत चित्राकृती ✻**

श्री. लक्ष्मीकांत काळे,
श्रीमती प्राजक्ता केरकर

**अक्षरजुळणी :** मुद्रा विभाग,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद :** ७० जीएसएम, क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश :**

**मुद्रक :**

**✻ निर्मिती ✻**

श्रीमती मिताली शितप
**प्र. मुख्य निर्मिती अधिकारी**
श्री. प्रशांत हरणे
**निर्मिती अधिकारी**

**✻ प्रकाशक ✻**

श्री. हेमंत बाबर
**प्र. नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५

## भारताचे संविधान

**उद्देशिका**

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# भारताचे संविधान

**भाग ४ क**

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

## राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

# प्रस्तावना

बालमित्रांनो,

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अनुसार ‘कार्यशिक्षण’ या विषयाचे इयत्ता तिसरीचे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. तुमचे वय आणि अनुभव लक्षात घेऊन तयार केलेले हे पाठ्यपुस्तक अभ्यासताना तुम्हांला आनंद होईल आणि नवनवीन प्रात्यक्षिके आणि कृती करून पाहता येतील.

या पाठ्यपुस्तकामध्ये दैनंदिन जीवनातील कामांबद्दल माहिती मिळेल. घरातील व्यक्ती तसेच, परिसरातील व्यक्ती, वेगवेगळे व्यवसाय आणि कारागीर काय काम करतात हे तुम्ही जाणून घ्याल. चांगले वर्तन, एकमेकांशी नीट बोलणे आणि समाजात कसे राहावे हेही शिकायला मिळेल.

पुस्तकात अनेक कृती दिल्या आहेत जसे की, कागदापासून वस्तू तयार करणे, पानाफुलांची रांगोळी काढणे, माळा–तोरण तयार करणे, बियांच्या कलाकृती, मातीपासून खेळणी तयार करणे, परसबागकाम आणि क्षेत्रभेटी या कृतींमुळे तुमची कल्पनाशक्ती, हस्तकौशल्ये आणि विचार करण्याची क्षमता वाढीस लागेल.

कृती, चित्रे, संवाद, गोष्टी, गाणी आणि खेळ यांमुळे शिकणे अधिक सोपे आणि आनंददायी होईल. तुम्हांला स्वतः प्रत्येक कृती करून शिकण्याची संधी या पाठयपुस्तकात मिळेल. शिक्षक तुमच्या कामाकडे लक्ष देतील आणि तुम्ही काय शिकला आहात हे पाहतील व त्याची नोंद घेतील. प्रत्येकाने आपल्या पद्धतीने शिकावे, प्रयत्न करावा आणि प्रत्येक कृतीत सहभाग घ्यावा, ही अपेक्षा आहे.

पुस्तकातील आवडलेल्या आणि आणखी भर घालण्यासारख्या अपेक्षित बाबी आम्हाला अभिप्राय रूपाने कळवायला विसरू नका. चला तर मग, शिकूया, करूया आणि आनंद घेऊया!

तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**(अनुराधा ओक)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.४

पुणे
दिनांक : १९ एप्रिल २०२६
भारतीय सौर दिनांक : वैशाख शु.२, शके १९४८, अक्षय्यतृतीया

# शिक्षकांसाठी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार निश्चित करण्यात आलेल्या ५+३+३+४ या शैक्षणिक आकृतीबंधाच्या अनुषंगाने पूर्वतयारी स्तराचा विचार करून इयत्ता तिसरीसाठी कार्यशिक्षण या विषयाचे पाठ्यपुस्तक प्रथमच विकसित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देताना त्यांच्या अनुभवविश्वाशी निगडित, कृतीप्रधान आणि आनंददायी शिक्षण देणे हा या पाठ्यपुस्तकाचा मुख्य उद्‌देश आहे. या पाठ्यपुस्तकाची रचना करताना कृती व अनुभव आधारित पद्‌धतीचा समावेश करण्यात आला आहे. अभ्यासक्रमातील ध्येये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती यांचा विचार करून उपक्रम व कृतींचा आशय निवडण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील कामांची ओळख, घरातील व परिसरातील व्यक्तींची भूमिका, सामाजिक जीवनात सकारात्मक वर्तन, तसेच विविध व्यवसाय व कारागीर यांच्या कार्याची माहिती अनुभवातून मिळावी, यासाठी विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य, हस्तकौशल्य, तांत्रिक कौशल्य आणि सर्जनशीलता विकसित करण्याच्या दृष्टीने कागदकाम, पानाफुलांची रांगोळी, तोरण-माळा, बियांपासून कलाकृती, मातीपासून खेळणी तयार करणे, परसबाग, क्षेत्रभेट, शब्दकोडे अशा विविध कृती उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व कृती उपक्रम अनुभवाधारित उदाहरणांसह स्पष्ट केल्या असून विद्यार्थ्यांच्या जीवनाशी त्यांची सांगड घालण्यात आली आहे. आकर्षक चित्रे, प्रात्यक्षिक कृती, रंगसंगती आणि प्रत्यक्ष कृतींमुळे हे पाठ्यपुस्तक अधिक प्रभावी व मैत्रीपूर्ण असे तयार झाले आहे.

प्रत्येक घटक कृतिशीलतेला व विचारक्षमतेला प्राधान्य देत क्षमता व अध्ययन निष्पत्तीशी जोडलेला आहे. संवाद, गोष्टी, गाणी यांचा वापर करून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आनंददायी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या पाठ्यपुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्यक्ष कृतींवर आधारित अध्यापनाला दिलेले महत्त्व होय. या कृती वर्गात आणि वर्गाबाहेर करता येण्यासाठी प्रत्येक घटकाच्या खाली गुलाबी चौकटीत शिक्षकांसाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

'विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांच्या भाषेचा (Sign Language) तसेच अन्य पूरक अध्यापन पद्‌धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या पद्‌धतीने शक्य असेल, त्या पद्‌धतीने व्यक्त होण्याची संधी द्यावी.

अभ्यासक्रम ध्येय(अ.ध्ये.), क्षमता(क्ष.), अध्ययन निष्पत्ती (अ.नि.), अध्ययन अनुभव व मूल्यांकन पद्‌धती यांचा विचार करून शासनाने निश्चित केलेल्या तासिकांनुसार उपक्रमांची मांडणी करण्यात आली आहे. अध्ययन निष्पत्तीची परिणामकारकता तपासण्यासाठी विविध निकषांचा वापर करून सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करावे. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करताना संवेदनशीलता बाळगून, त्यांना अभिव्यक्त होण्याची व कृतीत सहभागी होण्याची संधी देणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित करण्यासाठी अनेक शिक्षक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत. अशा उपक्रमांची माहिती व छायाचित्रे पाठ्यपुस्तक मंडळाकडे पाठवावीत, या पाठ्यपुस्तकाचा प्रत्यक्ष वापर केल्यानंतर संबंधितांनी आपल्या सूचना व अभिप्राय मंडळाकडे कळवावे ही अपेक्षा. आपल्या कल्पना व उपक्रमांचे मनःपूर्वक स्वागत आहे.

२१ व्या शतकातील विद्यार्थी सक्षम, सर्जनशील आणि जबाबदार नागरिक व्हावा, यासाठी या पाठ्यपुस्तकाद्‌वारे एक सकारात्मक पाऊल उचलले गेले आहे. या प्रयत्नास सर्वांचे सहकार्य लाभो, हीच अपेक्षा.

**कार्यशिक्षण (विषय समिती)**
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

# अभ्यासक्रम, अध्ययन, क्षमता, घटक

| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम ध्येय :** CG-1 : दैनंदिन कामाविषयी माहिती घेणे. | |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-1.1 : घरातील व्यक्तींच्या दैनंदिन कामाविषयी माहिती सांगणे. | **घटक : दैनंदिन कामे** |
| **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती (LOs)** |
| १) कुटुंबातील दैनंदिन कामे | १) घरातील व्यक्तींच्या दैनंदिन कामांचे निरीक्षण करतो. |
| २) घरातील साधने | २) घरातील कामे करताना वापरल्या जाणाऱ्या साधन साहित्याची माहिती घेतो. |
| ३) साधनांचा उपयोग | ३) घरातील विविध साधनांचे उपयोग स्वत:च्या शब्दांत सांगतो. |
| ४) घरकामात मदत | ४) स्वत:ची आवड व क्षमतेनुसार घरकामात मदत करतो. |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-1.2. : परिसरातील व्यक्तींच्या दैनंदिन कामाविषयी माहिती घेणे व त्याविषयी सांगणे. | |
| **घटक :** परिसरातील व्यक्तिंची कामे | |
| १) परिसरातील व्यक्ती व त्यांचे काम | ५) परिसरातील व्यक्तींच्या कामाचे निरीक्षण करतो. |
| २) कामाचा उपयोग | ६) परिसरातील व्यक्तींच्या कामाचे उपयोग सांगतो. |
| | ७) परिसरातील व्यक्तींच्या कामाचा अनुभव सांगतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय :** CG-2 : सामाजिक जीवन जगताना सकारात्मक वर्तन करणे. | |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-2. 1. : घरात व समाजात वावरताना सकारात्मक वर्तन करणे. | **घटक :** आपले वर्तन |
| १) सकारात्मक वर्तन | ८) कुटुंबातील व्यक्तींच्या सकारात्मक वर्तनाचे निरीक्षण करतो. |
| २) अनुकरण | ९) कुटुंबातील व्यक्तींच्या सकारात्मक वर्तनाचे अनुकरण करतो. |
| ३) कुटुंब व सुरक्षा | १०) कुटुंबाची सुरक्षितता समजून त्याप्रमाणे वर्तन करतो. |
| **घटक –** समाज | |
| १) सामाजिक वर्तनाचे नियम | ११) समाज वर्तनाचे नियम समजून त्याप्रमाणे वर्तन करतो. |
| २) आपत्कालीन परिस्थितीतील वर्तन | १२) आपत्कालीन परिस्थितीचा अर्थ समजून घेतो. |
| ३) स्वसुरक्षा | १३) स्व सुरक्षिततेबाबत माहिती मिळवतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय :** CG-3 : विविध व्यावसायिक/कारागीर यांच्या कामासंबंधी उत्सुकता व स्वारस्य दाखवणे. | |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-3.1 : परिसरातील व्यवसाय व व्यावसायिक यांच्या कामाविषयी माहिती घेणे. | |
| **घटक :** परिसरातील व्यवसाय ओळख | |
| १) व्यवसाय ओळख | १४) परिसरातील व्यवसायांची ओळख करून घेतो. |
| २) परिसरातील पारंपरिक व्यवसाय | १५) परिसरातील पारंपरिक व्यवसायांची माहिती घेतो. |
| ३) परिसरातील आधुनिक व्यवसाय | १६) परिसरातील पारंपरिक व आधुनिक व्यवसाय यांच्यातील वेगळेपण समजून माहिती मिळवतो. |
| ४) व्यवसायातील वेगळेपण | १७) पारंपरिक व आधुनिक व्यवसाय यांचे वेगळेपण सांगतो. |
| ५) श्रमप्रतिष्ठा | १८) परिसरातील व्यावसयिक/कारागिरांच्या कामाबाबत आदर बाळगतो. |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-3.2 : परिसरातील सजीव आधारीत उत्पादक कार्याबाबत जाणून घेणे. | **घटक :** निसर्ग एक स्त्रोत |
| **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती (LOs)** |
| १) परसबाग | १९) परसबागेच्या कामाविषयी माहिती घेतो. |
| २) पशुपक्ष्यांशी निगडीत व्यवसाय | २०) पशुपक्ष्यांशी निगडित व्यवसायांची माहिती घेतो. |
| **अभ्यासक्रम ध्येय :** CG-4 : विविध कौशल्यांचा विकास करणे. | |
| **अभ्यासक्रम क्षमता :** C-4.1 हस्त, संभाषण व तांत्रिक कौशल्य विकसित करणे. | **घटक :** कौशल्य विकास |
| १) हस्तकौशल्य | २१) दैनंदिन कामासाठी आवश्यक कौशल्ये समजून घेतो. |
| | २२) हस्त कौशल्याचा वापर करून विविध वस्तू तयार करतो. |
| २) संभाषण कौशल्य | २३) संभाषण कौशल्याचा वापर करून संवाद साधतो. |
| ३) तांत्रिक कौशल्य | २४) दैनंदिन वापरांच्या वस्तूंमधील तंत्रज्ञान समजून त्यांचा योग्य वापर करतो. |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | घटक | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | दैनंदिन कामे | १ |
| २. | साधनांचा उपयोग | ३ |
| ३. | घरकामात मदत | ७ |
| ४. | पाककला | १० |
| ५. | माझा परिसर | ११ |
| ६. | परसबाग | १४ |
| ७. | परिसरातील व्यक्ती व त्यांची कामे | २० |
| ८. | कामांचा उपयोग | २५ |
| ९. | हस्तकौशल्य | २९ |
| १०. | आपले वर्तन : सकारात्मक वर्तन | ३२ |
| ११. | कुटुंब व सुरक्षा | ३५ |
| १२. | सामाजिक वर्तनाचे नियम | ३९ |
| १३. | आपत्कालीन परिस्थितीतील वर्तन | ४३ |
| १४. | स्वसुरक्षा चांगला स्पर्श/वाईट स्पर्श | ४५ |
| १५. | परिसरातील व्यवसाय ओळख | ४८ |
| १६. | श्रमप्रतिष्ठा | ५६ |
| १७. | हस्तकौशल्य | ५७ |
| १८. | पशुपक्ष्यांशी निगडित व्यवसाय | ५९ |
| १९. | मत्स्यव्यवसाय | ६४ |
| २०. | आवश्यक कौशल्ये | ६६ |
| २१. | तंत्रज्ञानातील बदल | ७४ |
| २२. | संगणकाच्या भागांची ओळख | ७६ |


**सूचना :** विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांच्या भाषेचा (साईन लँग्वेज) तसेच अन्य पूरक अध्यापन पद्धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या पद्धतीने शक्य असेल, त्या पद्धतीने व्यक्त होण्याची संधी द्यावी.

विनामूल्य वितरणासाठी

# १. दैनंदिन कामे

दैनंदिन कामे म्हणजे दररोज करावी लागणारी कामे. ही कामे वेळेवर आणि नीट केल्यामुळे आपले जीवन शिस्तबद्ध व आनंदी राहते. आपल्याला चांगल्या सवयी लागतात आणि आपण निरोगी व जबाबदार बनतो. दैनंदिन कामांना आपल्या जीवनात खूप महत्त्व आहे.

## माझी कृती

**१. दिलेल्या चित्रांचे निरीक्षण कर. कोण काय करत आहे याबाबत गप्पा गोष्टी कर.**













## २. कोण काय करते ?

**चित्रांचे निरीक्षण करून कोण काय काम करत आहे ते तुझ्या शब्दांत लिही.**

१) आजी – ....................................................

२) ताई – ....................................................

३) बाबा – ....................................................

४) आजोबा – ....................................................

५) आई – ....................................................

६) दादा – ....................................................

**३. तुझ्या घरातील व्यक्ती कोणकोणती कामे करतात याची माहिती खालील रिकाम्या जागेत लिही.**




अ. ध्ये. १
क्ष. १.१
अ. नि. १

• घरातील दैनंदिन कामांविषयी गप्पागोष्टी कराव्या.

# २. साधनांचा उपयोग

आपण दररोज अनेक कामे करतो. ही कामे करण्यासाठी विविध वस्तू लागतात. अशा वस्तूंना साधने म्हणतात. चला तर मग काही साधनांची ओळख करून घेऊया.


पोळपाट – लाटणं


झाडू


तवा


परात


खराटा


बादली


शौचालय घासायचा ब्रश


झारी


खुरपं


घमेलं


पातेलं


कंगवा

## माझी कृती

**१. चित्रांचे निरीक्षण कर. चित्रातील वस्तूंचे नाव सांग व उपयोग लिही.**

| वस्तू (चित्र) | वस्तूचे नाव | उपयोग |
|---|---|---|
|  | | |
|  | | |
|  | | |
|  | | |

| | | |
|---|---|---|
|  | | |
|  | | |
|  | | |

२. घरातील दैनंदिन कामांसाठी लागणाऱ्या साधनांची चित्रे जमवून चिकटव आणि त्याखाली त्याचे नाव व उपयोग लिही.

नाव ........................ नाव ........................ नाव ........................
उपयोग ........................ उपयोग ........................ उपयोग ........................

नाव ........................ नाव ........................ नाव ........................
उपयोग ........................ उपयोग ........................ उपयोग ........................

नाव ........................ नाव ........................ नाव ........................
उपयोग ........................ उपयोग ........................ उपयोग ........................

## ३. माझा जोडीदार शोध

पोळी



गॅस शेगडी



पुरी



फुलझाड



माती



गवत



कढई



झारी



तवा



लायटर



गवत कापायची कात्री



घमेलं



## ४. ओळखा पाहू – मी कोण ?

१) पोळी–भाकरीचे पीठ मळण्यासाठी वापरतात. ................................

२) फुलझाडांना पाणी घालण्यासाठी उपयोग करतात. ................................

३) झाडे लावताना खड्डा करण्यासाठी वापर करतात. ................................

४) दाणे कुटण्यासाठी वापर करतात. ................................

५) गरम पातेले उचलण्यासाठी वापर करतात. ................................

६) किसण्यासाठी उपयोग करतात. ................................

७) वीज नसली की मसाला वाटण्यासाठी उपयोग करतात. ................................

८) अस्वच्छ हात स्वच्छ करण्यासाठी उपयोग करतात. ................................

९) धान्य पाखडण्यासाठी वापर करतात. ................................

१०) गॅस शेगडी किंवा चूल पेटवण्यासाठी वापर करतात. ................................



• गप्पागोष्टीतून विद्यार्थ्यांच्या घरी स्वयंपाक, स्वच्छता, बागकाम या कामांसाठी कोणती साधने वापरतात हे विचारावे. यादी तयार करून घ्यावी.

अ. ध्ये. १
क्ष. १.२
अ. नि. २,३

# ३. घरकामात मदत

घरातील सर्व व्यक्तींनी कामात एकमेकांना मदत करावी. त्यामुळे कामे लवकर होतात. जबाबदारीची भावना तयार होते. स्वच्छता व नीटनेटकेपणाची सवय लागते. कुटुंबात प्रेम व सहकार्य वाढते.

## माझी कृती



### १. गाणे गाऊया

चला आपण सारे विचार करू या
घरातल्या कामांमध्ये मदत करू या ॥

आई – आजी स्वयंपाक करतात, त्यांना मदत करू या
स्वयंपाक करून, सारे जण जेवायला बसू या ॥

दादा भाजी निवडतो, आपणही निवडू या
झालेला कचरा उचलून, दादाला मदत करू या ॥

आजोबा बागेत काम करतात, त्यांना मदत करू या
झाडांना पाणी घालून, झाडे वाढवू या ॥

काका–बाबा भाजी आणतात, कापडी पिशवी देऊ या
पिशवी उचलून, दोघांना मदत करू या ॥

ताई – काकी रांगोळी काढतात, त्यांना मदत करू या
रंग भरून रांगोळी सुंदर बनवू या ॥

घरातल्या कामांमध्ये मदत करू या
मदत करून सगळ्यांना आनंद देऊ या ।।

• गाणे तालासुरात म्हणून घ्यावे. घरातील कामांत मदत केल्यामुळे होणारे फायदे समजावून सांगावेत.

२. खालील चित्रांमध्ये घरातील व्यक्ती वेगवेगळी कामे करत आहेत. त्यापैकी तू मदत करत असलेल्या कामांच्या चित्रापुढे ✓ अशी खूण कर.

















## ३. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. तू घरकामात मदत करतोस का ?

..........................................................................................

२. तू मदत करत असलेल्या कमीतकमी पाच कामांची यादी कर.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................



अ. ध्ये. १

क्ष. १.१

अ. नि. ४

• विद्यार्थ्यांकडून घरातील कामे करण्याचे नाट्यीकरण करून घ्यावे.

# ४. पाककला

घरी उपलब्ध असणाऱ्या पदार्थांचा वापर करूनही चविष्ट पदार्थ तयार करता येतात. त्यातून पोषण मूल्येही मिळू शकतात. आज आपण इंधनविरहीत पाककृती करणार आहोत.

## माझी कृती

खालील चित्राचे निरीक्षण कर व उपलब्ध साहित्य व साधनांचा उपयोग करून दडपे पोहे तयार कर.

### साहित्य व साधने

पोहे, कांदे, हिरवी मिरची, खारे शेंगदाणे, साखर, मीठ, लिंबू, टोमॅटो, ओल्या नारळाचा किस, चमचा, वाटी व भांडे.



१. भांड्यात पोहे घे.




२. कांदा, टोमॅटो, मिरची चिरून घे.



३.पोह्यामध्ये चिरलेला कांदा, टोमॅटो, मिरची, शेंगदाणे, खवलेले खोबरे, साखर, मीठ एकत्र कर व लिंबाचा रस घालून व्यवस्थित हलवून घे.



४. पोह्याच्या भांड्यावर ताटली झाक.



५. झाकलेल्या ताटलीवर जड वस्तू ठेवून १५ मिनिटे तसेच ठेव



६. तयार झालेले दडपे पोहे.

• दडपे पोहे तयार करण्यासाठी लागणारे साहित्य आणण्यास सांगून वर्गात स्वत:च्या उपस्थितीत दडपे पोहे तयार करून घ्यावे.

अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २२

विनामूल्य वितरणासाठी

# ५. माझा परिसर

आपले घर व त्याच्या सभोवतालचा भाग म्हणजे परिसर. यात शाळा, रस्ते, घरे, झाडे, बागा, प्राणी, पक्षी, शेती, माती, दगडगोटे, नदी, नाले, दवाखाना, बस स्थानक, रेल्वे स्थानक अशा सर्व सजीव व निर्जीव गोष्टी येतात.

**१. शहरी परिसर**




शाळा

## माझी कृती



### १. दिलेल्या चित्रांविषयी चर्चा कर.

१. दिलेल्या दोन चित्रांतील फरक सांग ?
२. चित्रातील मुले कोठे चालली आहेत ?
३. तुला शाळेतून घरी येताना काय/काय दिसते ?
४. तुझ्या परिसरातील कमीतकमी पाच गोष्टींची नावे सांग ?



### २. तुझ्या परिसराचे चित्र काढ.

अ. ध्ये. १
क्ष. १.२
अ. नि. ५

• शहरी परिसर व ग्रामीण परिसर यांतील फरक समजावून सांगावा.

# ६. परसबाग

घर, शाळा किंवा परिसरातील उपलब्ध जागेमध्ये रोपांची लागवड करून तयार केलेली छोटी बाग म्हणजे परसबाग. परसबागेत लहान प्रमाणावर भाजीपाला फळे लावली जातात. परसबागेत फळभाज्या, पालेभाज्या, औषधी वनस्पती, फळांची झाडे लावतात. उदा. गवार, भेंडी, गवती चहा, टोमॅटो, काकडी, लिंबू, ओवा, आले, घोसाळी, कारले, नारळ, पेरू, सीताफळ, तुळस, फुलझाडे इत्यादी.

परसबागेत लागवड केल्याने आपल्याला ताजी फळे, फुले, पाने, भाज्या, औषधी वनस्पती मिळतात.

परसबागेत लागवड  करण्यासाठी फळझाडे, भाजीपाला, फुलझाडे यांची रोपे शासकीय रोपवाटिका, कृषि विद्यापीठ,  खाजगी रोपवाटिका येथे उपलब्ध होतात.

परसबागेतील ताज्या भाज्या आणि फळांमुळे योग्य पोषण मिळू शकते. आरोग्य सुधारण्यास मदत होते. बाजारातून भाजी, फळे विकत घेण्याचा खर्च कमी होतो. जास्त उत्पादन झाल्यास विक्री करून उत्पन्नही मिळू शकते.



## माझी कृती

१. तू भेट दिलेल्या परसबागेतील झाडांची नावे लिही.

......................................................................................................................................................

२. शाळा किंवा घरातील परसबागेत लावण्यासाठी कोणती झाडे व रोपे निवडशील ?

......................................................................................................................................................

३. शब्दकोड्यात लपलेल्या पाच औषधी वनस्पतींची नावे शोधून लिही.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क | आ | था | डा | पा | ग |
| डु | व | स | ह | च | व |
| निं | ळा | तु | ळ | स | ती |
| ब | ब्रा | म्ही | द | आ | च |
| डा | दु | वी | पी | ले | हा |
| गु | ळ | वे | ल | डा | स |

__________ __________ __________ __________ __________

__________ __________ __________ __________ __________

- परिसरातील परसबाग किंवा भाजीच्या मळ्याला भेट देऊन तेथील भाजीपाला, फळझाडे यांची माहिती द्यावी.
- परसबागेत कोणत्या फळभाज्या, पालेभाज्या, फुलझाडे, फळझाडे दिसली त्यांची यादी तयार करण्यास सांगावे.
- क्षेत्रभेट हा उपक्रम घेणे अनिवार्य आहे.







## माझी कृती

**१. परसबागेतील भाज्यांची नावे सांग.**

---

**२. तुला आवडणाऱ्या भाज्यांची यादी कर.**

---

**३. पाहुणा ओळख व त्याभोवती गोल कर.**

१) टोमॅटो, वांगे, मेथी, ढोबळी मिरची.

२) कारले, काकडी, घोसाळे, आंबट चुका.

३) पालक, आले, कोथिंबीर, शेपू.

४) गाजर, बीट, मुळा, भेंडी.

- शाळेतील परसबागेत झाडांना पाणी देण्याचे नियोजन करावे.
- पोषण आहारासाठी लागणाऱ्या भाज्या, फळभाज्या शाळेच्या परसबागेत लावण्यास सांगावे.
- भाजी बाजार किंवा आठवडी बाजाराला पालकांसोबत भेट देण्यास सांगावे.

## ◈ कुंडीतील लागवड

कधीकधी रोपांची लागवड करण्यासाठी घर किंवा शाळेत जागा उपलब्ध नसते. अशा वेळी रोपांची लागवड कुंडीत केली जाते.

### कुंड्यांचे विविध आकार



### माझी कृती

**१. चित्रातील कुंडीचे सुशोभन कर.**



- कोणकोणत्या रोपांची लागवड कुंडीत केली जाते याबाबत माहिती द्यावी.
- प्रात्यक्षिकाद्‌वारे कुंडीत रोपाची लागवड करून दाखवावी.

## ◈ माझी छोटी बाग

**परसबागेतील कामे :** परसबागेमध्ये झाडाला पाणी देणे, माती चाळणे, खत मिसळणे, तण काढणे, कुंपण करणे, बी लावणे, नवीन रोपे लावणे, रोपांच्या वाढीचे निरीक्षण करणे अशी कामे करावी लागतात. ही कामे करताना परसबागेतील साहित्य काळजीपूर्वक हाताळणे व काम झाल्यावर स्वत:ची स्वच्छता करणे आवश्यक आहे.



### माझी कृती



**१. परसबागेत तू वाढवलेल्या रोपाला त्याचे नाव लिहिलेला कागद लाव.**

**२. परसबागेत काम करताना लागणाऱ्या साहित्यांची यादी तयार कर.**

अ. ध्ये. ३

क्ष. ३.२

अ. नि. १९

• परसबागेत काम करताना घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन करावे.

## कोशिंबीर (पालक – मेथी)

परसबागेत विविध पालेभाज्यांची लागवड केली जाते. यातील पालेभाज्यांचा वापर करून पौष्टिक कोशिंबीर तयार करता येते.

### माझी कृती

खालील साहित्य व साधनांचा उपयोग करून पालक – मेथी कोशिंबीर तयार कर.

**साहित्य व साधने**

मेथी आणि पालकची पाने, कांदा, टोमॅटो, मीठ, लिंबू, तिखट, चाट मसाला, पातेलं, मोठा चमचा, सुरी इत्यादी.

**कृती :** मेथी व पालकाची पाने निवडून धुवावी. चाळणीवर निथळत ठेवावी. टोमॅटोही धुऊन घ्यावे. मोठ्यांच्या मदतीने मेथी व पालक, कांदा, टोमॅटो बारीक चिरून घ्यावे व पातेल्यात सगळे चिरलेले पदार्थ एकत्र करावेत. त्यात चवीप्रमाणे मीठ, तिखट व थोडा चाट मसाला घालून चमच्याने व्यवस्थित हलवून घ्यावे. तयार झालेली पौष्टिक व चवदार मेथी – पालक कोशिंबीर सर्वांनी मिळून खावी.



- संबंधित पदार्थ करण्यासाठी विद्यार्थ्यांना उपलब्धतेनुसार साहित्य आणण्यास सांगावे.
- विद्यार्थ्यांच्या सहभागाने कृती करून घ्यावी.

# ७. परिसरातील व्यक्ती व त्यांची कामे

परिसरातील अनेक व्यक्ती वेगवेगळी कामे करतात त्यामुळे आपले जीवन सुरळीत चालते. यापैकी काही कामांची ओळख करून घेऊया.



दूधवाला



शिवणकाम करणारा



हार –फुले विकणारा फुलवाला



डॉक्टर पेशंटला तपासताना



सफाई करणारा – सफाई कामगार



फळविक्रेता



वृत्तपत्र विक्रेता



पाळणाघर




मोबाईल विक्री केंद्र

- चित्रातील व्यावसायिकांच्या कामाबाबत माहिती द्यावी.

विनामूल्य वितरणासाठी

## माझी कृती

१. तुझ्या परिसरात आढळणाऱ्या व यापेक्षा वेगळा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींविषयी माहिती सांग.

२. तुझ्या पसिरात आढळणाऱ्या इतर व्यक्तींच्या कामांच्या चित्रांचा संग्रह कर व चिकटव.

- विविध व्यावसायिकांची चित्रे किंवा फ्लॅशकार्ड दाखवून त्याविषयी माहिती सांगावी.

## ३. माझे काम ओळख



काम : ....................................

..............................................



काम : ....................................

..............................................



काम : ....................................

..............................................



काम : ....................................

..............................................



काम : ....................................

..........................................



काम : ....................................

..........................................



काम : ....................................

..........................................



काम : ....................................

..........................................

### ४. रिकाम्या जागी योग्य अक्षर लिही व व्यवसायिकांचे नाव पूर्ण कर.

१. वै ____ ____ क

२. ____ भि यं ____

३. दु____ ____ ____ र

४. ह____ ल____ र

५. का____ खा____ दा____

६. वि____ तं____

### ५. तुझ्या परिसरात आढळणाऱ्या आणि अशी काही कामे करणाऱ्या व्यक्तींच्या कामांची यादी कर.

............................................................

............................................................

............................................................

............................................................

............................................................

............................................................

............................................................

............................................................

............................................................

............................................................

............................................................

............................................................

• परिसरातील विविध कामे करणाऱ्या व्यक्तींना शाळेत बोलवावे. त्यांची मुलाखत घेण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी.

# ८. कामांचा उपयोग

आपल्या परिसरातील व्यक्ती विविध कामे करत असल्याने त्या कामांची एकमेकांना मदत होते. त्यामुळे प्रत्येक काम महत्वाचे असते.

**माझी कृती**

**१. खालील चित्रातील व्यक्ती वेगवेगळी कामे करीत आहेत. त्यातील कामांचे नाव सांग व आपल्याला होणारे उपयोग लिही.**










**चित्रातील कामांचा उपयोग.**

१. .................................. २. ..................................

३. .................................. ४. ..................................

५. .................................. ६. ..................................

७. .................................. ८. ..................................

**२. या व्यतिरिक्त इतर कोणत्या कामांसाठी आपल्याला मदत लागते याची यादी तयार कर.**

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**३. एका शब्दात उत्तर लिही.**

१) वाहन धुण्याचे ठिकाण ............................

२) वाहतूक सुरळीत करणारा ............................

३) घरोघरी पत्र, पार्सल देणारा ............................

४) सामान विकणारा ............................

५) बसमध्ये तिकीट देणारा ............................

६) धान्य पिकवणारा ............................



**४. मोठा झाल्यावर तुला कोण व्हायला आवडेल ?**

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## ५. तक्ता पूर्ण कर.

| व्यक्ती | काम | उपयोग |
|---|---|---|
| शिक्षक | मुलांना अभ्यासात मदत करतात | मुले सुजाण होतात. |
| शेतकरी | ______________ ______________ | अन्नधान्य मिळते. |
| ______________ | रोगांवर उपचार करतात | आपले आजार बरे होतात. |
| सफाई कामगार | रस्त्यांची सफाई करतो | ______________ ______________ |
| ट्रॅफिक पोलिस | ______________ ______________ | वाहतूक सुरळीत राहते. |
| पोस्टमन | ______________ ______________ | लोकांना वेळेत पत्रे व पार्सल मिळतात. |
| दुकानदार | दैनंदिन वापरातील वस्तू विकतात | ______________ ______________ |
| बागकाम करणारा | ______________ ______________ | बाग सुंदर राहते. सुशोभित होते. |
| इलेक्ट्रिशियन | विजेची उपकरणे दुरुस्त करतात | ______________ ______________ |
| प्लंबर | नळ दुरुस्त करतात. | ______________ ______________ |

अ. ध्ये. १
क्ष. १.२
अ. नि. ६

• विविध व्यक्तीच्या कामाचे उपयोग समजून सांगावे.

## ◈ माझे आवडते काम

**६. खाली दिलेल्या विविध व्यावसायिकांच्या कामांपैकी तुला आवडणाऱ्या कामाखाली ✓ अशी खूण कर.**













- विद्यार्थ्यांच्या आवडत्या कामाविषयी माहिती विचारावी.
- विविध व्यावसायिकांचा भूमिकाभिनय करून घ्यावा. ते कोणते काम करीत आहे हे ओळखण्याचा खेळ घ्यावा.

# ९. हस्तकौशल्य

दुसऱ्याबद्दल असलेल्या भावना व्यक्त करण्यासाठी, शुभेच्छा देण्यासाठी भेटकार्डाचा उपयोग होतो.

## माझी कृती

### १. भेटकार्ड तयार करणे.

खाली दिलेल्या साहित्य व साधनांचा वापर करून चित्रातील क्रमानुसार कृती कर.

**साहित्य व साधने**

गुलाबी कार्डशीट, पांढरा कार्डशीट, कात्री, ग्लू किंवा डिंक, स्केचपेन, ग्लिटर पेन इत्यादी.






२. शिक्षक दिनाच्या दिवशी शिक्षकांना देण्यासाठी भेटकार्ड तयार कर.

३. रंगीत कागदापासून पक्षी तयार कर.






- भेटकार्ड तयार करण्यासाठी आवश्यक साहित्य व साधने आणण्यास सांगावे.
- साहित्य व साधनांचा सुरक्षित वापर करण्यास सांगावे.

अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २२

विनामूल्य वितरणासाठी

◈ मातीच्या वस्तू बनवणे

## ४. दिलेल्या क्रमांकानुसार कृती करून मातीचा मोबाईल तयार कर.

**साहित्य आणि साधने**

१. मऊ माती
२. पाणी
३. माती भिजवण्यासाठी भांडे
४. सजावटीसाठी रंग
५. हात पुसण्यासाठी कापड
६. ब्रश



१. माती भिजवणे



२. माती मळणे



३. हाताने आकार देणे



४. वस्तू वाळवणे



६. वस्तूला रंग देणे

अ. ध्ये. १
क्ष. १.२
अ. नि. ७

- विद्यार्थ्यांना फळे, वस्तू, खेळणी इत्यादी बनवण्यास सांगावे.
- विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरवावे.

## १०. आपले वर्तन : सकारात्मक वर्तन

राहुलने खेळणी खेळून झाल्यावर ती व्यवस्थित जागेवर ठेवली. हे पाहून त्याच्या आईला खूप आनंद झाला आणि तिने त्याला शाबासकी दिली. अनन्याचा पाय चुकून आजोबांच्या चष्म्याला लागला, पण तिने लगेच 'माफ करा' म्हटले आणि चष्मा नीट उचलून ठेवला. ही सकारात्मक वर्तनाची उदाहरणे आहेत.

### माझी कृती

**सकारात्मक वर्तन म्हणजेच चांगले वर्तन.**

**१. खालील चित्रांचे निरीक्षण कर. योग्य वर्तन असणाऱ्या चित्राखाली ✓ अशी खूण कर.**















## २. तू काय करशील ?

१. आजोबा वर्तमानपत्र वाचण्यासाठी चष्मा शोधत आहेत.

२. आई बाजारातून सामानाच्या पिशव्या घेऊन येत आहे.

३. बाबा ऑफिसमधून घरी आले आहेत.

४. घरी पाहुणे आले आहेत.

५. घरात एखाद्या खोलीत कोणीही नाही. तरी लाईट व पंखे चालू आहेत.

६. रस्त्यात केळीचे साल पडले आहे.

७. घरात वर्तमान पत्रे, मासिके, पुस्तके पडली आहेत.

८. कुंडीतील झाड वाळत चालले आहे.

९. दप्तर खाली पडले असून त्यातील वह्या –पुस्तके बाहेर आली आहेत.

१०. घरातील पाण्याचा नळ चालू आहे.

अ. ध्ये. २
क्ष. २.१
अ. नि. ०८

• चित्रांच्या आधारे सकारात्मक वर्तनाविषयी गप्पागोष्टी कराव्या.

## ◈ सकारात्मक अनुकरण

कुटुंब व समाजातील व्यक्तींचे चांगले गुण व सवयी यांचे निरीक्षण करून त्याप्रमाणे वागणे यालाच 'सकारात्मक अनुकरण' म्हणतात.









### माझी कृती



**तुझ्या कुटुंबातील मोठ्या व्यक्तींच्या कोणत्या चांगल्या वागण्याचे अनुकरण करतोस/करतेस ते लिही.**

______________________________

______________________________

______________________________

अ. ध्ये. २

क्ष. २.१

अ. नि. ०९

• 'अनुकरण' प्रसंगाबाबत चर्चा करून घ्यावी. त्यातील सकारात्मक वर्तनाच्या कृतींचा अभिनय करून घ्यावा.

# ११. कुटुंब व सुरक्षा

**माझी कृती**



## १. चला गाणे गाऊया



माझे कुटुंब, छान कुटुंब,
माया लावणारे माझे कुटुंब !
आई - बाबा, ताई - दादा
घराचे घरपण, आजी आजोबा !



घराची सुरक्षा - आमची जबाबदारी,
सावध राहू आम्ही भारी !
अनोळखी व्यक्तीला दारात अडवू,
कुटुंब सुरक्षेचे नियम पाळू !



पाण्याचा नळ असो वा विजेचे आणि गॅसचे बटण
सांभाळून वापर करू सारे जण !
घराबाहेर जाताना दाराला कुलूप लावू,
दरवाजे, खिडक्या बंद करू !

एकमेकांची घेऊ काळजी,
सुरक्षा महत्त्वाची, माझ्या घराची !

**आपल्या घराची सुरक्षा ही घरातील प्रत्येकाची जबाबदारी आहे.**

• कुटुंब व सदस्यांच्या सुरक्षिततेचे छोटे प्रसंग सांगून अभिनय करून घ्यावा.

## २. सांग पाहू

१) अनोळखी व्यक्ती दारात आल्यावर तू काय करशील ?

२) घराबाहेर जाताना तू कोणती काळजी घेशील ?

३) पाण्याचा नळ किंवा विजेची उपकरणे वापरताना तू कोणती काळजी घेशील ?

४) तुझ्या घरात सुरक्षेसाठी आई-बाबा काय करतात ?

५) कुटुंबाच्या सुरक्षेसाठी काय केले पाहिजे असे तुला वाटते ?

## ३. कोणकोणत्या प्रसंगी सुरक्षितता घ्यावी लागते ते लिही.

## ४. तुझ्या वहीमध्ये खालील संपर्क क्रमांक (मोबाईल नंबर) लिहून ते पाठ कर.

* आई -
* बाबा -
* शेजारी किंवा नातेवाईक -
* वर्गशिक्षक -
* मुख्याध्यापक -

### आपत्कालीन क्रमांक

* पोलीस - १००
* रुग्णवाहिका - १०२
* लहान मुले व मातांसाठी रुग्णवाहिका - १०८
* अग्निशमन दल - १०१
* चाइल्ड हेल्पलाईन नंबर -१०९८



• विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तरांवर चर्चा करावी.

## प्रथमोपचार पेटी

आपल्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीला तातडीच्या इलाजाची गरज असल्यास प्रथमोपचार पेटी आपल्याला उपयोगी पडते. कापले, खरचटले, भाजले किंवा जखम झाल्यास यातील साहित्याचा उपयोग करून आपण घरच्या घरी तात्पुरता आणि तातडीचा इलाज करू शकतो. घरातील मोठ्या व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली प्रथमोपचार पेटीतील साहित्याचा वापर करावा.

### प्रथमोपचार पेटीतील आवश्यक साहित्य

**कापूस, मलम (जखमेवर लावण्याचे, भाजलेल्या त्वचेवर लावण्याचे, इत्यादी), जखमेवरची बांधपट्टी (बँडेज), कात्री, तापमापक (थर्मामीटर), बिटाडाईन, डेटॉल, जखमेवरची मलमपट्टी (बँडेड), सेफ्टीपिन, रुमाल व जल संजीवनी (ओरल रिहायड्रेशन सोल्युशन) इत्यादी.**




**५. खालील साहित्य कशासाठी वापरतात त्यापुढील चौकोनात ✓ अशी खूण कर.**

| साहित्य | १. | किंवा | २. | |
|---|---|---|---|---|
| निर्जंतुक कापूस | जखम स्वच्छ करणे | | ताप मोजणे | |
| कातरी | मलम लावणे | | बँडेज कापणे | |
| जलसंजीवनी(ORS) | शरीराचे निर्जलीकरण दूर करण्यासाठी व थकवा दूर करण्यासाठी | | जखम धुण्यासाठी | |
| मिठाचे पाणी | ताप आल्यावर डोक्यावर घड्या ठेवण्यासाठी | | जखमेवर लावण्यासाठी | |
| बिटाडाईन | सरबत करण्यासाठी | | जंतूसंसर्ग रोखण्यासाठी | |

## ६. योग्य चित्राखाली ✓ अशी खूण कर.

| | | |
|---|---|---|
| जखमेवर बांधण्यासाठी वापरतात |  जखमेवरची बांधपट्टी (बँडेज) |  कागद |
| | | |
| जखमेवर लावण्यासाठी वापरतात |  मलम | मीठ  |
| | | |
| ताप मोजण्यासाठी वापरतात. |  पट्टी |  थर्मामीटर |
| | | |

## ७. खालील साधनांच्या चित्रांचे निरीक्षण कर व त्याच्या उपयोगाबाबत माहिती मिळव.



रक्तातील साखर मोजण्याचे यंत्र



रक्तातील ऑक्सिजन मोजण्याचे यंत्र


रक्तदाब मोजण्याचे यंत्र

- प्रथमोपचार पेटीतील साहित्याची ओळख करून द्यावी. त्याचे उपयोग सांगावे. मुलांना त्या वस्तू प्रत्यक्ष हाताळायला द्याव्यात. त्यातील साहित्य कसे वापरावे याचे प्रात्यक्षिक दाखवावे.
- वापराची तारीख(एक्सपायरी डेट) पाहून योग्य साहित्य प्रथमोपचार पेटीत ठेवावे.

अ. ध्ये. २
क्ष. २.१
अ. नि. १०

# १२. सामाजिक वर्तनाचे नियम

परिसरात वावरताना आपल्या काही कृतींमुळे इतरांना त्रास होण्याची शक्यता असते म्हणून इतरांना त्रासदायक होणारे वर्तन आपण टाळले पाहिजे.

## माझी कृती

**१. खालील चित्रे बघ. योग्य कृतीखाली चौकोनात ☐✓ आणि अयोग्य कृती खाली ☐✕ अशी खूण कर.**




☐




☐




☐



☐



☐




☐

• योग्य सामाजिक वर्तनाबाबत चर्चा, गप्पागोष्टी कराव्यात व यादी करून घ्यावी.

२. **बरोबर व चुकीच्या कृती ओळख. बरोबर कृती समोरील चौकोनात ✓ आणि चुकीच्या वर्तनाखाली ✗ अशी खूण कर.**

१) रुग्णालयात मोठ्या आवाजात गप्पा माराव्यात. ☐

२) रस्ता ओलांडताना झेब्रा क्रॉसिंगचा वापर करावा. ☐

३) सार्वजनिक बागेतील फुले तोडावी. ☐

४) प्राणी व पक्ष्यांना इजा पोहोचवू नये. ☐

५) रस्त्यावर थुंकू नये. ☐

**३. चित्राचे निरीक्षण कर व तू काय करशील ते लिही.**



**१) मित्र शाळेच्या बाकावर करकटकने कोरत आहे.**

– ..................................................

**२) सार्वजनिक ठिकाणचा पाण्याचा नळ चालू आहे. त्यातून पाणी वाहत आहे.**

– ..................................................





**३) बसमध्ये म्हातारे आजोबा उभे आहेत. तू सीटवर बसला आहेस.**

– ..................................................

## ४. चित्रांचे निरीक्षण करून वाहतुकीच्या नियमांबद्दल चर्चा कर.













- वाहतुकीच्या नियमांची माहिती करून द्यावी. कारमध्ये चाईल्ड सीट बेल्ट लावणे. लहान मुलांना दूचाकी वरून नेतांना बेबी कॅरिअर (कांगारु) वापरणे. यांसारख्या सुरक्षेच्या सुचनात्मक माहिती द्यावी.
- वाहतुकीच्या नियमांचा भूमिकाभिनय करून घ्यावा.

रस्त्यावरील वाहतूक सुरळीत चालावी यासाठी वाहतुकीचे नियम आणि चिन्हे तयार केली आहेत. या वाहतुकीच्या नियमांचे व चिन्हांचे सर्वांनी पालन केले पाहिजे.

**५. तुझ्या परिसरात रस्त्याने जाताना खालील चिन्हे दिसतात का ते पहा व त्यांची माहिती घे.**

१) थांबा




२) पुढे शाळा आहे



३) प्रवेश बंद



४) अरुंद पूल



५) रेल्वे मार्ग (रेल्वे क्रॉसिंग)



६) वाहने उभी करण्यास मनाई (नो पार्किंग)



७) गतिरोधक (स्पीड ब्रेकर)



८) पादचारी मार्ग (झेब्रा क्रॉसिंग )



९) पुढे जाण्यास मनाई (नो ओव्हरटेकिंग)



१०) हॉर्न वाजवण्यास मनाई (नो हॉर्न)



**६. माहीत असलेली वाहतुकीची चिन्हे कार्डबोर्डच्या सहाय्याने तयार कर व तुझ्या शाळेच्या परिसरात लाव.**

- वाहतूक पोलिसाच्या मुलाखतीचे आयोजन करावे.
- वाहतुकीच्या चिन्हांची फ्लॅशकार्डस् बनवून घ्यावीत व खेळ घ्यावा.

अ. ध्ये. २
क्ष. २.१
अ. नि. ११

# १३. आपत्कालीन परिस्थितीतील वर्तन

आपत्कालीन परिस्थिती म्हणजे निसर्गनिर्मित किंवा मानवनिर्मित अचानक येणारे संकट. यात भूकंप, पूर, अपघात, आग लागणे इत्यादींचा समावेश होतो.




## माझी कृती

### १. चित्राचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे दे

१. माणसांची गर्दी का जमली आहे ? ..........

२. फोन कोणाला लावला असेल ? ..........

३. कोणती गाडी आली आहे ? ..........

४. अग्निशमन यंत्रणेचा फोन नंबर काय आहे ? ..........

५. अग्निशमन यंत्रणेलाच का बोलावले आहे ? ..........

## २. तुला माहीत असलेल्या नैसर्गिक आपत्ती व मानव निर्मित आपत्तींची नावे लिही.

| नैसर्गिक आपत्ती | मानव निर्मीत आपत्ती |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |

## ३. आपत्कालीन परिस्थितीत आपले वर्तन कसे असावे हे लिही.

..................................................................................

..................................................................................

..................................................................................

..................................................................................

### ◈ आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी असणारे संपर्क क्रमांक

पोलीस – १००

अग्निशमन दल – १०१

चाइल्ड हेल्पलाइन – १०९८




रुग्णवाहिका – १०२, १०८

- 'आपत्कालीन परिस्थिती' ही संकल्पना समजावून सांगावी. इतर आपत्कालीन परिस्थिती भूकंप, पूर, भिंत कोसळणे, अपघात उद्‌भवल्यास आपले वर्तन कसे असावे यांची प्रात्यक्षिके करून घ्यावी.
- अग्निशमन दल, रुग्णवाहिका यांमधील कर्मचाऱ्यांस प्रत्यक्ष बोलावून मुलाखत घ्यावी.

अ. ध्ये. २
क्ष. २.२
अ. नि. १२

# १४. स्वसुरक्षा : चांगला स्पर्श/वाईट स्पर्श

**चांगला स्पर्श**

ज्या स्पर्शामुळे आपल्याला सुरक्षित आणि आनंदी वाटते असा स्पर्श.







**वाईट स्पर्श**

ज्या स्पर्शामुळे अस्वस्थ, भीतीदायक किंवा लज्जास्पद वाटते असा स्पर्श.







• चित्रांच्या मदतीने स्व-सुरक्षिततेचा अर्थ समजावून द्यावा. चांगला स्पर्श - वाईट स्पर्श समजावून सांगावे.

## ◈ स्व–सुरक्षेचे नियम

संकटकाळी किंवा असुरक्षित परिस्थितीमध्ये सुरक्षेचे खालील नियम लक्षात ठेव.



**१. तुझ्या शरीरावर फक्त तुझाच हक्क आहे. कोणालाही तुझ्या परवानगीशिवाय तुला स्पर्श करण्याचा अधिकार नाही.**



**२. पालकांपासून कोणतीही गोष्ट लपवू नये.**




**३. संकटकाळी नाही म्हणा – कोणी चुकीचा स्पर्श करायचा प्रयत्न केला तर न घाबरता जोरात ओरड किंवा मोठ्याने नाही म्हण.**



**४. जर कोणी एखादा स्पर्श गुपित ठेवायला सांगत असेल तर तो नक्कीच वाईट स्पर्श (बॅड टच) आहे.**



**५. सर्व स्पर्श नेहमी वाईट नसतात**

६. असुरक्षित वाटल्यास तेथून पळून जा. लगेच सुरक्षित ठिकाणी किंवा गर्दीच्या ठिकाणी पळून जा.





७. आपल्या विश्वासू व्यक्तीला (आई, बाबा, शिक्षक, पोलीस) घडलेला प्रकार सांग. जोपर्यंत कोणी तुमचे ऐकत नाही. तोपर्यंत सांगत रहा.




- चांगला स्पर्श, वाईट स्पर्श यांबाबत चर्चा करवून घ्यावी.
- स्व-सुरक्षा कशी करता येईल याविषयी चर्चा करावी. शाळेच्या दर्शनी भागात चाईल्ड हेल्पलाइन नंबर मनोदर्पण व टेलिमानस हेल्पलाइन नंबर प्रदर्शित करणे अनिवार्य आहे.
- शाळेतील तक्रारपेटीबाबत माहिती द्यावी.

अ. ध्ये. २
क्ष. २.३
अ. नि. १३

# १५. परिसरातील व्यवसाय ओळख

प्रत्येक व्यक्ती कोणतेतरी काम करून स्वत:चा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असते. याला व्यवसाय असे म्हणतात. त्यापैकी काही व्यवसायांची चित्रे खाली दिलेली आहेत.

## माझी कृती

**१. खालील चित्रांचे निरीक्षण कर व त्या व्यवसायांविषयी माहिती सांग.**















**२. वरील चित्रांव्यतिरिक्त काही व्यावसायिकांची चित्रे जमवून चिकटव.**

अ. ध्ये. २

क्ष. २.३

अ. नि. १४

• शाळेजवळच्या व्यावसायिक ठिकाणी क्षेत्रभेटीसाठी न्यावे व संबंधित व्यावसायिकाची मुलाखत घ्यावी.

## ◈ परिसरातील पारंपरिक व्यवसाय

पिढ्यान्‌पिढ्या जे व्यवसाय केले जातात त्या व्यवसायांना ‘पारंपरिक व्यवसाय’ म्हणतात.

**माझी कृती**

### १. मी काय करतो आहे ?



..............................................................



..............................................................



..............................................................



..............................................................



..............................................................



..............................................................

विनामूल्य वितरणासाठी

**२. तुला माहीत असलेल्या विविध पारंपरिक व्यवसायांची यादी कर.**

......................................................................................................

......................................................................................................

......................................................................................................

......................................................................................................

......................................................................................................

**३. आपल्या घराजवळ/शाळेजवळ असलेल्या पारंपरिक व्यवसाय चालणाऱ्या ठिकाणी भेट दे. तेथील व्यावसायिकांकडून त्यांच्या कामाविषयी माहिती घेताना खालील प्रश्नांचा उपयोग कर.**

१) तुम्ही काय काम करता?
२) यासाठी तुम्हांला काय काय साहित्य लागते?
३) तुमचे आजी-आजोबा देखील हाच व्यवसाय करायचे का?
४) तुम्ही कोणकोणत्या वस्तू तयार करता ?
५) तयार झालेल्या वस्तू तुम्ही कोठे विकता?

◆ **मिळालेली माहिती येथे नोंदव**

......................................................................................................

......................................................................................................

......................................................................................................

......................................................................................................

......................................................................................................

......................................................................................................

......................................................................................................

......................................................................................................

......................................................................................................

- चित्रे दाखवून त्यातील व्यवसाय समजावून सांगावे.
- या व्यवसायांना पारंपरिक व्यवसाय का म्हणतात ते सांगावे व इतर पारंपरिक व्यवसायांची माहिती द्यावी.
- शाळेजवळील पारंपरिक व्यवसायाला भेट देऊन तेथील व्यावसायिकांची मुलाखत घेण्यास सांगावे.

अ. ध्ये. ३
क्ष. ३.१
अ. नि. १५

## ◈ परिसरातील आधुनिक व्यवसाय

बदलत्या काळानुसार आणि आपल्या बदललेल्या गरजांनुसार व्यवसायातही बदल झाले आहेत. अशा नव्या स्वरूपातील व्यवसायांना 'आधुनिक व्यवसाय' म्हणतात.



**माझी कृती**

### १. खाली दिलेल्या चित्रातील व्यवसाय ओळख व लिही.




..........................................................................................



.............................................



.........................................................



.........................................................



२. आधुनिक व्यवसायांची चित्रे जमवून चिकटव.

३. जवळच्या आधुनिक व्यवसायाच्या ठिकाणी भेट दे. व्यावसायिकाला विचारण्यासाठी प्रश्नावली तयार कर. व्यावसायिकाची मुलाखत घेऊन येथे नोंद कर.

........................................

........................................

........................................

........................................

........................................

अ. ध्ये. ३
क्ष. ३.१
अ. नि. १६

• आधुनिक व्यवसायांची माहिती द्यावी.

## ◈ व्यवसायातील वेगळेपण

### माझी कृती

**१. दिलेल्या चित्रांचे निरीक्षण कर व त्यातील वेगळेपण ओळख.**

















- एकाच प्रकारच्या दोन व्यवसायांतील फरक चित्रातून विचारावे.

## २. शब्दकोडे

उलट सुलट दिलेली अक्षरे नीट जुळव व व्यवसाय कोणता ते ओळख.

१. सं न शु व र्ध प –

२. मा म का त –

३. ग का रं म –

४. ह क तु वा –

५. मा मा री से –



## ३.पुढे दिलेल्या चौकटीतून तीन व्यावसायिकांची नावे शोध.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | भि | यं | ता | पा | चि | त्र | का | र |
| ट | ही | रा | न | सो | का | पो | ळ | स |
| वा | अ | ग्नि | वी | र | ट | ली | ला | व |
| मी | डॉ | ष | में | मै | क | स | डॉ | ली |
| क | शि | र | धे | ढ | दे | त्री | क्ट | वा |
| र | का | क्ष | ते | क्ट | पा | तो | र | द |
| म | सै | औ | क | आ | र | ळ | ई | क |
| ळ | ते | नि | स | र | शि | पा | ई | ध |
| का | वा | ट | क | दु | का | न | दा | र |

अ. ध्ये. ३

क्ष. ३.१

अ. नि. १७

• पारंपरिक व आधुनिक व्यवसायातील वेगळेपण समजावून द्यावे.

# १६. श्रमप्रतिष्ठा

प्रत्येक जण कोणतातरी व्यवसाय करून अर्थार्जन करीत असतो. आपल्याला प्रत्येक वस्तू स्वत: तयार करणे शक्य नाही. त्यासाठी एकमेकांची मदत घ्यावी लागते. त्यामुळे प्रत्येकाचे काम हे महत्त्वाचे असते.

उदाहरणार्थ :

१. सफाई कामगार कचरा गोळा करतो.
२. शेतकरी धान्य पिकवतो.
३. शिक्षक अध्यापन करून विद्यार्थ्यांना अध्ययनास मदत करतात.
४. फायरमन आग विझवतात.
५. डॉक्टर औषधोपचार करतात.

- **प्रत्येक व्यक्तीने काम केल्यामुळे आपले जीवन सुरळीत चालण्यास मदत होते.**
- **प्रत्येकाच्या कामाचा आपण आदर केला पाहिजे.**

## माझी कृती

१) तुझ्या शाळेतील काका, मावशी, सफाई कामगार यांना देण्यासाठी कागदी फुलांचा छान गुच्छ तयार कर आणि त्यांना देऊन त्यांचे आभार मान.
२) सैनिकांना पाठवण्यासाठी राखी तयार कर व त्यावर छानसा आभार संदेश तयार करून लिही.





- व्यावसायिक व मदतनीसांनी कामे केली नाही तर काय होईल यावर चर्चा करावी.
- कामाचा आणि काम करणाऱ्यांचा आदर करणे गरजेचे आहे ते पटवून सांगावे.
- पुष्पगुच्छ, राखी, भेटकार्ड तयार करून घ्यावे.

अ. ध्ये. ३
क्ष. ३.१
अ. नि. १८

# १७. हस्तकौशल्य

## रंगीत कागदांपासून पुष्पगुच्छ

कागदापासून खूप प्रकारच्या आकर्षक रचना तयार करता येतात. मित्रमैत्रिणींना आपल्या हातांनी तयार केलेला पुष्पगुच्छ दिला तर नक्कीच त्यांना तो खूप आवडेल म्हणून रंगीत कागदांचा वापर करून आपण फुलांचा पुष्पगुच्छ तयार करणार आहोत.



## माझी कृती

खालील दिलेल्या साधन व साहित्याचा वापर करून चित्रातील क्रमाने कृती करा.

**साहित्य व साधने :–** कार्डशीट , पांढरा टिशू पेपर, वेगवेगळ्या रंगाचे पातळ कागदाचे तुकडे, डिंक, स्केचपेन इत्यादी.




अ. ध्ये. ४

क्ष. ४.१

अ. नि. २१.२

• पुष्पगुच्छ तयार करण्यासाठी आवश्यक ते साहित्य आणण्यास सांगावे व नमुन्याप्रमाणे पुष्पगुच्छ तयार करून घ्यावा.

# १८. पशुपक्ष्यांशी निगडीत व्यवसाय

प्राचीन काळापासून माणूस प्राण्यांशी व पक्ष्यांशी मैत्री करून त्यांचा उपयोग शेती, वाहतूक, अन्न व इतर गरजांसाठी करत आला आहे. गावामध्ये व शहराजवळ काही कुटुंबे गायी व म्हशी, कोंबड्या किंवा शेळ्या पाळून व्यवसाय करतात. आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. आपल्याला रोज मिळणारे दूध, अंडी, मध आणि इतर काही अन्नपदार्थ हे प्राण्यांपासून मिळतात. हे पदार्थ विकून विविध व्यवसाय केले जातात. उदा. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मध विक्री इत्यादी.

## माझी कृती



**१) खाली पशुपक्ष्यांची चित्रे दिली आहेत. चित्रांचे निरीक्षण कर. पशुपक्ष्यांचे आपल्याला होणारे उपयोग लिही.**

| पशु/पक्षी चित्र | उपयोग |
|---|---|
|  | ........................................ |
|  | ........................................ |
|  | ........................................ |
|  | ........................................ |

| | |
|---|---|
|  | |
|  | |
|  | |
|  | |

२. तुझ्या परिसरातील प्राण्यांचे निरीक्षण करून त्यांचे उपयोग सांग.

१) कुत्रा ..........

२) मांजर ..........

३) बैल ..........

४) गांडूळ ..........

५) गाढव ..........

## पशुपक्ष्यांशी निगडित व्यवसाय :



३. खालील चित्रांचे निरीक्षण कर व त्या संदर्भात अधिक माहिती सांग.











## ४. तुझ्या परिसरातील पशुपक्ष्यांशी निगडीत व्यवसायांना भेट दे.

**क्षेत्रभेटीचे ठिकाण :**

१. दुग्धव्यवसाय केंद्र/डेअरी
२. घरगुती कुक्कुटपालन/पोल्ट्रीफार्म
३. घरगुती शेळी किंवा मेंढी पालन/गोटफार्म
४. मधमाशी पालन केंद्र

**क्षेत्रभेटीनंतर खालील प्रश्नांच्या आधारे माहिती लिही.**

- कोणते प्राणी किंवा पक्षी पाळले आहेत त्यांची नावे लिही.
- त्यांना काय खाद्य दिले जाते ?
- त्यांची काळजी कशी घेतली जाते ?
- कोणत्या प्राण्यापासून काय उत्पादन मिळते ते पहा व लिही.
- त्या उत्पादनांची साठवण व विक्री कशी केली जात आहे ?
- तुला कोणता व्यवसाय करायला आवडेल ? का ?

## ५. तुझ्या परिसरात/गावात कोणकोणते व्यवसाय आहेत ते लिही ?

## ६. खालील मुद्द्यांच्या मदतीने तुझ्या परिसरातील एका व्यावसायिकाची माहिती लिही

**मुद्दे :**
- व्यावसायिकाचे नाव
- कोणते काम करतो
- कधीपासून
- कामाचा उपयोग
- कुटुंबातील कोणकोण व्यवसायात मदत करते ?

## ७. जोड्या लावा : प्राणी व त्यांच्यापासून मिळणाऱ्या वस्तू

| अ | उत्तरे | ब |
|---|---|---|
| गाय | | मध |
| मधमाशी | | लोकर |
| कोंबडी | | दूध |
| मेंढी | | अंडी |



- परिसरातील पशुपक्ष्यांशी निगडीत व्यवसायाच्या ठिकाणी विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट आयोजित करावी.
- क्षेत्रभेटीचे आयोजन करणे अनिवार्य आहे.

अ. ध्ये. ३
क्ष. ३.२
अ. नि. २०

# १९. मत्स्यव्यवसाय

नदी, कालवे, धरणे, तळी, समुद्र तसेच खासगी तलाव येथे मासे आढळतात. मासे पकडणे म्हणजे मासेमारी करणे होय. मासे पकडण्यासाठी यांत्रिक साधने तसेच विविध प्रकारची जाळी वापरतात. या पद्धतीने एकाच वेळी भरपूर प्रकारचे आणि जास्त प्रमाणात मासे मिळतात.

**विविध प्रकारचे मासे :**



**कटला मासा**



**मृगळ मासा**



**मुलेट मासा**



**पापलेट मासा**



**सुरमई मासा**



**चॅनोस मासा**

मासे हे मानवाचे पौष्टिक खाद्य आहे. मासे लवकर खराब होतात. जास्त दिवस टिकवण्यासाठी मासे बर्फामध्ये साठवले जातात. ताजे मासे, वाळवलेले व खारवलेले मासेही आहारात वापरतात. ताज्या माशांना जास्त बाजारभाव मिळतो. मत्स्य व्यवसायामुळे रोख उत्पन्न मिळते. स्थानिक पातळीवर रोजगार मिळतो.

**माझी कृती**

**१. तुला माहीत असलेल्या माशांची नावे सांग.**

अ. ध्ये. ३
क्ष. ३.२
अ. नि. २०

• परिसरातील मासळी बाजारास भेट द्यावी. विद्यार्थ्यांना विविध माशांची माहिती घेण्यास सांगावे.

## २. सुशोभन

दिलेल्या साहित्याचा वापर करून चित्रांच्या क्रमानुसार सुशोभनाची कृती कर.

**साहित्य व साधने :–** पांढरा कागद, पेन्सिल, टरफले, रंग, ब्रश.



• टरफलांपासून विविध सुशोभने तयार करून घ्यावी.

# २०. आवश्यक कौशल्ये

एखादे काम प्रभावीपणे, उत्तमरीत्या करण्याची क्षमता म्हणजे कौशल्य. एखाद्या गोष्टीची नुसती माहिती असणे पुरेसे नसते. तर त्या माहितीचा वापर करून प्रत्यक्ष कृती उत्तम करणे गरजेचे असते.

उदा. – संगणकातील माहिती वाचणे म्हणजे ज्ञान मिळवणे, परंतु संगणकाचा प्रत्यक्ष वापर करून कामे करणे म्हणजे कौशल्य होय.

- **हस्त कौशल्य** – हातांच्या मदतीने अचूकपणे विविध कामे करता येणे. घरकाम करणे, शिवणकाम करणे, उदा. हस्त कौशल्याच्या वस्तू बनवणे, इत्यादी हस्तकौशल्ये आहेत.






- **संभाषण कौशल्य :** इतरांशी बोलताना आपले विचार, भावना व माहिती स्पष्टपणे व प्रभावीपणे पोहोचवण्याची क्षमता.

- **तांत्रिक कौशल्य :** एखाद्या विशिष्ट साधनाचा, यंत्राचा व तंत्राचा वापर करून काम अचूकपणे पूर्ण करण्याची क्षमता.



**कौशल्यांचे महत्त्व :**

- **स्वावलंबन :** आपण इतरांवर अवलंबून राहत नाही.
- **आत्मविश्वास :** कोणेतेही काम उत्तम जमू लागले की आपला आत्मविश्वास वाढतो.
- **सर्जनशीलता :** नवनवीन कल्पना सुचून नवीन गोष्टी करण्याची क्षमता निर्माण होते.

अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २१

• कौशल्याचे महत्व समजावून सांगावे.

## ◈ हस्तकौशल्य : गिफ्ट बॉक्स

सण, वाढदिवस किंवा इतर महत्त्वाच्या प्रसंगी आपण मित्रमैत्रिणींना भेटवस्तू देतो. ही भेटवस्तू जर आपण स्वत: तयार केलेल्या सुंदर बॉक्समध्ये दिली तर ती अधिक मौल्यवान वाटेल. कार्डशीटचा वापर करून आज आपण एक छोटा गिफ्ट बॉक्स तयार करायला शिकणार आहोत.

### माझी कृती

**१. खाली दिलेल्या साहित्य व साधनांचा वापर करून चित्रातील क्रमानुसार कृती कर.**

**साहित्य व साधने :** कार्डशीट, कात्री, डिंक (ग्लू), स्केच पेन इत्यादी.

**कृतिक्रम :**



१


२


३


४


५


६


७


८




९



१०



११



१२



१३



१४



१५



आकर्षकता वाढवण्यासाठी टिकल्या, मणी इत्यादींचा वापर कर.

## सुरक्षितता

- कात्रीचा वापर सुरक्षितपणे कर.

- गिफ्ट बॉक्ससाठी आवश्यक साहित्य आणण्यास सांगावे.
- विविध आकारांचे मोजमाप करताना आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे.

## २. पानाफुलांची सजावट

वेगवेगळ्या पानाफुलांपासून सुंदर रचना करता येते. उपलब्ध पानाफुलांपासून रांगोळी, हार, तोरण, गजरे तयार करता येतात.

खाली पानाफुलांच्या रांगोळी व सजावटीची चित्रे दिली आहेत. तुझ्या आवडीची पानाफुलांची सजावट किंवा रांगोळी तयार कर.














## ◈ संभाषण कौशल्य

दैनंदिन जीवन जगताना आपल्या सभोवती असणाऱ्या वेगवेगळ्या व्यक्तींशी आपण बोलतो. व्यक्तींच्या आपापसात बोलण्यास 'संवाद' म्हणतात. संवाद चांगला होण्यासाठी योग्य पद्धतीने बोलणे गरजेचे असते. याला 'संभाषण कौशल्य' म्हणतात.




**माझी कृती**

**१. संवाद वाचून त्यातील योग्य व अयोग्य संभाषण ओळख.**

- **मित्र पहिला :** मला तुझ्या जवळचे गोष्टीचे पुस्तक वाचायला देतोस का?
  **मित्र दुसरा :** हो. हे घे !
  **मित्र पहिला :** धन्यवाद ! ...............................
- **आजी :** मुली, हा पत्ता सांगतेस का?
  **मुलगी :** नाही ! मी कामात आहे. दुसऱ्या कोणाला तरी विचारा.
  (त्रासिक आवाजात) ...............................
- **स्त्री :** मी जनगणनेसाठी आले आहे. घरी मोठे कोणी आहे का?
  **मुलगा :** नाही काकू, आत्ता आई-बाबा घरी नाहीत.
  **स्त्री :** तू माहिती सांगतोस का?
  **मुलगा :** (नम्रतेने) नाही काकू, कृपया तुम्ही नंतर या. ...............................

विनामूल्य वितरणासाठी

- **शिक्षक :** मुलांनो, आपल्याला बालसभा आयोजित करायची आहे.

  **मुलगी :** हो का सर? कधी घ्यायची आहे बालसभा?

  **शिक्षक :** पुढच्या आठवड्यात घेऊया का?

  **मुलगा :** चालेल सर ! पुढच्या शुक्रवारी घेऊया.

  **शिक्षक :** मग... कोण तयार आहे. बालसभेसाठी कामांची जबाबदारी घ्यायला?

  **मुलगी :** मी तयार आहे सर.

  **मुलगा :** मी पण तयार आहे सर.

## २. योग्य संभाषणे लिही

- ग्राहक व दुकानदार यांच्यातील संभाषण.

- घरी पाहुणे आल्यानंतर त्यांच्यासोबत होणारे संभाषण.

अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २३

- वेगवेगळ्या विषयांवर संवाद तयार करावेत.

## तांत्रिक कौशल्य

साधनांच्या मदतीने काम सफाईदारपणे करण्याची क्षमता म्हणजे 'तांत्रिक कौशल्य' होय.

## तांत्रिक कौशल्याचे महत्त्व

**तांत्रिक कौशल्य**

- कामात सफाईदारपणा
- वेळेची बचत
- इतर कामात उपयोग
- कमी श्रमात काम

### माझी कृती



**१. घरातील तांत्रिक साधनांची यादी तयार कर.**

..................................................................................

..................................................................................

**२. दैनंदिन जीवनात तांत्रिक कौशल्य वापरण्याचे महत्त्व सांग.**

..................................................................................

..................................................................................

अ. ध्ये. ४
क्ष. ४.१
अ. नि. २४

• गप्पागोष्टी करून तांत्रिक कौशल्याचे महत्त्व समजून सांगावे.

## तांत्रिक साधने

दैनंदिन जीवन जगत असताना आपण अनेक साधनांचा वापर करून कृती करतो. त्यापैकी काही कृती दिल्या आहेत.

**३. खालील चित्रांचे निरीक्षण करून चित्रात वापरलेल्या साधनांची यादी कर व त्याविषयी गप्पागोष्टी कर.**



कात्रीने कागद कापणे



रांगोळीच्या छापांच्या सहाय्याने रांगोळी काढणे



सुई दोऱ्याने हार बनवणे



सुरीने भाजी कापणे



ब्रशने पणती रंगवणे

# २१. तंत्रज्ञानातील बदल

बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानामध्ये बदल होत आहेत.

**माझी कृती**

**१. खालील चित्रांचे निरीक्षण कर व तंत्रज्ञानात झालेल्या बदलांबाबत चर्चा कर.**



खलबत्ता




मिक्सर



दूरध्वनी /लँडलाइन



मोबाइल



साधा टिव्ही



एलईडी



साधा फळा



इंटरॲक्टिव्ह बोर्ड



साधा संगणक




लॅपटॉप



चूल



गॅस



सायकल (जुनी)



गियरची सायकल

**२. एकाच कामासाठी वापरात येणाऱ्या परंतु काळानुसार तंत्रज्ञान स्वरूप बदललेल्या वस्तूंची यादी कर.**

........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

अ. ध्ये. ४

क्ष. ४.१

अ. नि. २४

• तंत्रज्ञानात होत असलेल्या बदलांबाबत विद्यार्थ्यांशी चर्चा/गप्पागोष्टी कराव्या.

# २२. संगणकाच्या भागांची ओळख

आजच्या काळात अनेक ठिकाणी संगणकाचा वापर केला जातो. उदाहरणार्थ : शाळा, कार्यालये, बँक, रुग्णालय इत्यादी.

संगणक इलेक्ट्रॉनिक यंत्र आहे. यात माहिती साठवता येते, माहितीवर प्रक्रिया करता येते आणि पाहिजे तेव्हा साठवलेल्या माहितीचा पुनर्वापर करता येतो. संगणकाचे विविध भाग असतात. संगणकांचे भाग व त्यांचे उपयोग खालील चित्रात दिले आहेत त्याचे निरीक्षण कर.



**मॉनिटर**

उपयोग : स्क्रीनवर माहिती पाहण्यासाठी



**की बोर्ड**

उपयोग : अंक, अक्षरे आणि संख्या टाईप करण्यासाठी



**माऊस**

उपयोग : माहिती निवडण्यासाठी, स्क्रोल करण्यासाठी



**सी.पी.यु.**

उपयोग : माहिती साठवण्यासाठी



**प्रिंटर**

उपयोग : माहिती छापण्यासाठी



**स्पीकर्स**

उपयोग : आवाज ऐकण्यासाठी

## माझी कृती

**१. संगणकाच्या भागांची नावे या शब्दकोड्यामध्ये लपलेली आहेत. ती नावे शोधून त्याला गोल कर व लिही.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| यू | टो | पो | मॉ | ग |
| पी | र | नी | सं | मा |
| सी | ट | बो | ऊ | ण |
| र | प्रिं | स | ई | क |

१) ............................

२) ............................

३) ............................

४) ............................

५) ............................

**२. खालील चित्रातील की–बोर्डवर अंक व अक्षरे की–बोर्डवर असलेल्या क्रमाने लिही.**



- संगणकाच्या विविध भागांची ओळख करून द्यावी.
- संगणकाच्या विविध भागांचे उपयोग समजावून सांगावे.

अ. ध्ये. ४

क्ष. ४.१

अ. नि. २४.३,४

## ◈ संगणक सुरू व बंद करणे

संगणकाच्या वापरामुळे अनेक कामे सोपी व लवकर होतात म्हणून संगणकाचा अनेक ठिकाणी उपयोग केला जातो. संगणक वापरण्यासाठी तो सुरू व बंद कसा करावा याबाबत माहिती असणे गरजेचे आहे.

### माझी कृती



**१. संगणक सुरू व बंद करण्याच्या कृतीचे निरीक्षण कर व पुन्हा त्या सर्व कृती कर.**



- **संगणक सुरू करणे**

  १. संगणकाचे प्लग असणारे विजेचे बटन सुरू कर.

  २. सी.पी.यू. (CPU) किंवा मॉनिटरवरील पॉवर बटण दाब.

  ३. मॉनिटर सुरू होईल. त्यानंतर काही वेळ थांब. डेस्कटॉप दिसेल.

- **संगणक बंद करणे.**




  १. संगणकाच्या खालील बाजूस असलेल्या स्टार्ट आयकॉनवर माऊसच्या सहाय्याने बाण (कर्सर) ने.

  २. त्यापुढे तुला पॉवर ⏻ हा पर्याय दिसेल.

  ३. माऊसच्या डाव्या बाजूचे बटण दाबून पॉवर पर्यायावर क्लीक कर.

  ४. त्यापुढे तुला स्लीप(sleep), शट्डाऊन(shut down) व रिस्टार्ट (Restart) हे तीन पर्याय दिसतील.

  ५. माऊसच्या डाव्या बाजूचे बटण दाबून पॉवरमधील शट्डाऊन (shut down) या पर्यायावर क्लिक कर. संगणक पूर्ण बंद होईपर्यंत थांब.

- **लक्षात असू दे**

  > अचानक संगणक बंद करू नये. नेहमी शट् डाऊन पर्याय निवडूनच संगणक बंद करावा.

  > शिक्षकांच्या किंवा पालकांच्या मदतीनेच संगणकाचा वापर करावा.

  > शिक्षकांच्या किंवा पालकांच्या परवानगीशिवाय संगणकात कोणतीही माहिती डाऊनलोड व शेअर करू नको.

• विद्यार्थ्यांकडून संगणक कक्षात संगणक चालू व बंद करण्याची कृती करून घ्यावी.

## माझे पान

मी गावातील यात्रेला मामाबरोबर गेलो होतो. तेथे मला काही व्यवसाय पहावयास मिळाले. खालील चित्रात ते व्यवसाय शोधूया.



# माझ्या परिसरातील काही व्यवसाय

**माझ्या परिसरातील व्यवसाय ओळखूया.**




















प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई-बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

**जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.**




**हे बटण दाबा.**

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.**




**चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबवला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.**

नए समाज की ओर
Towards a new dawn

- विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

कार्यशिक्षण इयत्ता तिसरी (मराठी माध्यम)

समग्र शिक्षा
Samagra Shiksha

(विनामूल्य वितरणासाठी)

